जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २८.०६.२०२५**

'' खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर कडून १ सराईत गुन्हेगारास दोन गावठी पिस्टल, ०१ जिवंत काडतूसासह जेरबंद ''

दिनांक २५/०६/२०२५ रोजी खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखेचे सपोनि/सुनिल तारमळे यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे सचिन शिंदे ,रा.बंदरपाडा, कल्याण पश्चिम याच्या ताब्यात दोन अग्नीशस्त्र व काडतुस आहेत.'' सदर मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने, खंडणी विरोधी पथकाचे सपोनि/सुनिल तारमळे हे व त्यांच्या पथकाने १६:४५ वाजता रोशन किराणा स्टोअर्स च्या बाजुला, मोहने रोड, बंदरपाडा, कल्याण पश्चिम या ठिकाणी सापळा कारवाई करुन आरोपी नामे सचिन गोपी उर्फ गोकुळ शिंदे, वय ३० वर्षे, व्यवसाय फळविक्री, रा.बंदरपाडा, कल्याण पश्चिम याने त्याच्या ताब्यात बेकायदेशिररित्या दोन गावठी बनावटीचे पिस्टल, १ जिवंत काडतुस असा एकूण १,००,५००/- रुपये किमर्तीचा ऐवज मिळून आला.

सदर आरोपीविरुद्ध खडकपाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५४७/२०२५ शस्त्र अधिनियम कायदा कलम ३, २५ सह महा.पो.का.कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी खडकपाडा पोलीस ठाणे येथे दुखापत व अंमली पदार्थ यासारखे दोन गुन्हे दाखल आहेत. आरोपी यास दिनांक ३०/०६/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर झालेला आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे तथा प्रभारी अधिकारी खंडणी विरोधी पथक, श्री.विनायक घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त, शोध -२, गुन्हे शाखा, ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/सुनिल तारमळे, सपोनि/गोरे, सपोपि/भुषण कापडणीस, पोउपनिरी/सुहास तावडे, सपोउपनिरी/संदीप भोसले, पोहवा/४०४४ ठाकुर, पोहवा/१०१५ पाटील, पोहवा/गायकवाड, पोहवा/जाधव, पोहवा/गडगे, पोहवा/राठोड, पोहवा/कानडे, मपोहवा/पावसकर, पोना/हासे, पोना/मधाळे, चापोना/हिवरे, पोलीस अंमलदार/वायकर, ढाकणे, पाटील, शेजवळ, मपोअंमलदार/ भोसले यानी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर